जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ सहाय्यक या पदावरील
कर्मचा-यांना वरीष्ठ सहाय्यक पदावर निवडीने
भरण्यासाठी स्पर्धात्मक परीक्षा सन २०१४ बाबत...

श्री.सचिन मधुकर वाघ,वरिष्ठ सहाय्यक

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/२५४/२०२५
अहिल्यानगर दि.१६/०६/२०२५

वाचा -
१. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन )नियमावली,१९८२ मधील नियम ५(१) नियम ३ (अ)
२. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन )नियमावली, २०२१ मधील नियम ४ (५).
३. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक ०१ यांचेकडील गोपनीय पत्र क्र.विकास/कार्या१९/ग्रा.पं./कावि-४८६९६/२०१५ दि.०२.११.२०१५
४. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/कार्या-१२ दि.१३.०७.२०२१
५. मा.अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक ०१ यांचेकडील आदेश क्र.जा.क्र.संकीर्ण-२०२५/४७८०४४८/विआशा/आस्था-२ दि.२७.०५.२०२५

श्री.सचिन मधुकर वाघ, वरिष्ठ सहाय्यक यांनी कनिष्ठ सहायक,भांडार सहायक,भांडारपाल व कॉम्पुटर या पदावरील मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा सन २०१४ आवेदनपत्र सादर केलेले होते. त्यानुसार सदर परिक्षा दि.३०.०५.२०१५ रोजी घेण्यांत आलेली होती. मर्यादित स्पर्धात्मक परिक्षा सन २०१४ च्या स्पर्धात्मक परीक्षेमध्ये श्री.सचिन मधुकर वाघ हे संदर्भ क्र.०३ अन्वये उत्तीर्ण झालेले आहेत. श्री.सचिन मधुकर वाघ यांची गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गामध्ये स्पर्धा परिक्षेतून वरिष्ठ सहाय्यक या पदावर पदस्थापनेपासून वंचित ठेवलेले आहे व त्यांचेवर प्रथमदर्शनी अन्याय झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच सन २०१४ चे वरिष्ठ सहाय्यक या स्पर्धा परिक्षेसाठी खुल्या प्रवर्गाचे निर्विवाद पद असते तर श्री.सचिन मधुकर वाघ, यांची वरिष्ठ सहाय्यक या स्पर्धा परिक्षेच्या पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेने नियुक्ती झाली असती. तसेच श्री.सचिन मधुकर वाघ यांची कनिष्ठ सहाय्यक या पदावर सलग १२ वर्षाची सेवा पूर्ण झालेने त्यांना सुधारित सेवांर्गत आश्वासीत प्रगती योजनेतंर्गत २०१५ पूर्वीच वरिष्ठ सहाय्यक या पदाची वेतनश्रेणी लागू केल्याने शासनाचे तिजोरीवर आर्थीक भार पडत नाही.

सबब महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे अधिनियम) नियमावली २०२१ मधील नियम २ (घ) व नियम ४ (१) मधील तरतूदीन्वये संदर्भ क्र.०५ अन्वये मा.विभागीय आयुक्त यांचे सुचनांनुसार श्री.सचिन मधुकर वाघ, वरिष्ठ सहाय्यक मर्यादित स्पर्धात्मक परिक्षा सन २०१४ मधील निकालानुसार ते गुणवत्तेनुसार निवड झालेने दि.३०.०५.२०१५ हा मानीव दिनांक देण्यांस मंजुरी दिलेली असल्याने या आदेशान्वये वरिष्ठ सहाय्यक या पदाची मानीव दिनांक मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक २०२५०६१६०४०७०४ असा आहे

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-06-2025 11:41:20
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रती,

श्री.सचिन मधुकर वाघ, वरिष्ठ सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर व्दारा - उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य), जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत - कार्यासन - आस्थापना - ३, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- संबधितांचे सेवाजेष्ठतेमध्ये आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

प्रत - कार्यासन -वेतन, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- मुळ सेवापुस्तकामध्ये नोंद घेवून सदरचा आदेश सेवापुस्तकामध्ये डकविण्यांत यावा.